FORM-1A

N.C.R.

I.I.F.

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0167741

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि.मुं. पहिली खबर क्र. FIR No. १४, वर्ष Year २०२०, दिनांक Date ०६/१०/२०२०

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि.१९८८ कलमे Sections ७, १२.
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार, तारीख पासून ०५/१०/२०२० १४:१३ तारीख पर्यंत ०५/१०/२०२० १४:२६
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १४/०९/२०२० वेळ Time ........
   (c) गुन्हा दाखल झालेया सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०५/२०२०, तारीख Date ०६/१०/२०२० वेळ Time ०७.३० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लाचेसंदर्भात, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव
   Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road: सचिनम बिल्डींग, तळ मजला, रूम नं ४८६ चे समोर,
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण, गाव, पोस्ट, तालुका, जिल्हा, राज्य
   Nearest identifiable place, Village, Post, Taluka, Dist., State: धारावी, मुंबई १७
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. मिर्झा माजिद बेग (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name असलम बेग
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age २६ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९५९८४९३०१९४
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation भाजी-विक्रेता
   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House Name No., फोन / मो. नं. Phone / Mo. No., पॅन नं. PAN No., वोटर्स नं. Card No.
   रस्त्याचे नाव Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.: रूम नं.०२, आय.जी.सी. चाळ, नवरंग हॉटेल चे मागे, धारावी, मेन रोड, मुंबई १७.
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

①सुभाष शिवराम राऊत, वय ५६ वर्षे, धंदा: लेबर मुकादम, नेमणूक: जी नॉर्थ वार्ड दादर (प) मुंबई, राहणार: ५०२, अनमोल हाईट, को ऑ.ही.सो; A विंग, संतोषी माता मंदिर जवळ कुरार व्हिलेज, मालाड (पूर्व) मुंबई.
② बसवराज तुकाराम गौडकर, वय: ५२ वर्षे, धंदा: वाहन स्वच्छक, नेमणूक (सध्या) जी नॉर्थ वार्ड, दादर (प). मुंबई. (कायम) वरळी यानगृह, मनपा, वरळी मुंबई राहणार. वाणी चाळ, चाळ नं ०५, रूम नं.०३, नाम जोशी मार्ग, पोलीस मीठ समोर, लोअर परेल मुंबई १३

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद ता.वे.व ठिकाणी फिर्यादी यांच्या घराच्या दुरुस्तीच्या बांधकामावर कारवाई न करण्यासाठी आरोपी लोकसेवक सुभाष याने फिर्यादीकडे रु 25000/- रोख रक्कमेच्या लाचेची मागणी करून तडजोडअंती रु 20,000/- रोख लाचेची रक्कम कोणत्याही कायदेशीर पारिश्रमिकाखेरीज, स्वतःच्या फायद्याकरीता स्वीकारली व सदरची लाचेची रक्कम लोकसेवक आरोपी बसवाणी यांचेकडे दिली असता बसवाणी यांनी सदर लाचेची रक्कम माहित असून देखील स्वतःच्या खिशात ठेवून मात्लोसे सुभाष यास मदत केली म्हणून कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधि 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. ..........
District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

Majid

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

06/10/2020

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name अमोल शिंदे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..........
Posting ला.प्र.वि. मुंबई.
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner

फिर्याद

दिनांक ०६/१०/२०२०

श्री. मिर्झा माजिद अस्लम बेग, वय २९ वर्षे, धंदा – भाजी विक्री रा.ठि.– रुम न.२, आय.जी.सी. चाळ, नॅशनल हॉटेलच्या समोर, धारावी मेन रोड, मुंबई १७ मो.नं. ९५९४९३०१९४

———ooo ———

मी वर नमूदप्रमाणे असून नमूद ठिकाणी माझी आई नामे हसीना बानु वय ५६ वर्षे, यांचे सह जन्मापासुन रहात आहे. माझे वडीलांचे ०५ वर्षापुर्वी निधन झाले आहे. माझे शिक्षण ६ वी पर्यन्त मुंबई मध्ये झालेले आहे. मी धारावी ६० फुट रोड येथे भाजी विक्रीचा व्यवसाय करुन उदर निर्वाह करतो.

मी रहात असलेले घर माझे वडिलांच्या नावे असुन सदरचे घर जुने झाल्याने व मोडकळीस आल्याने नवीन बांधकाम करीत आहे. त्याकरीता रेती व सिमेंट विकत घेवुन माझे घराचे बाहेर ठेवले होते. माझे बांधकामाची माहिती म.न.पा. कार्यालयास कोणीतरी कळविल्याने दि. १०/०९/२०२० रोजी म.न.पा. जी नॉर्थ वार्डचे कर्मचारी श्री सुभाष आणी त्यांचे सोबत श्री वाघ हे माझे घरी आले व त्यांनी घराचे मोजमाप केले. माझे घराचे बांधकाम अनधिकृत असल्याने सदरचे बांधकाम करावयाचे असल्यास रु. ६५,०००/– रक्कम दयावी लागेल असे श्री वाघ यांनी सांगितले. इतकी रक्कम माझे कडे नसल्याचे मी सांगितले असता त्यावर श्री सुभाष यांनी रु. ४०,०००/– इतकी रक्कम दयावी लागेल असे सांगितले. परंतु मला लोकसेवक सुभाष यांस लाच दयावयाची ईच्छा नसल्याने मी दि. १४/०९/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात येवुन लेखी तक्रार अर्ज सादर केला होता.

तसेच माझे बांधकामाकरीता म.न.पा.कडुन रितसर परवानगी मिळावी म्हणुन मा. सहायक पालीका आयुक्त, जी. नॉर्थ, दादर, मुंबई या ठिकाणी देखील दि.१६/०९/२०२० रोजी लेखी अर्ज सादर केला.

**मी,** दि. १४/०९/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई येथे दिलेल्या लेखी तक्रारीवरुन ला.प्र.वि. विभागाचे पो.नि. अमोल शिंदे, स.पो.आ. मुगुटराव यांचे समक्ष हजर झालो. पो.नि. शिंदे यांनी मी दि. १४/०९/२०२० रोजी लोकसेवका विरुध्द लाचेच्या मागणी संदर्भात तक्रारीची लगेच पडताळणी करण्याबाबत माझेकडे विचारणा केली असता, दुस–या दिवशी दि. १५/०९/२०२० रोजी लोकसेवक हे माझे रहाते घराच्या ठिकाणी येणार असल्याचे मी सांगितले. त्यावरुन दि. १५/०९/२०२० रोजी पो.नि. शिंदे यांनी मला माझे तक्रारीची दोन शासकिय पंचासमक्ष पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती दिली. तसेच सदर पडताळणीच्यावेळी लोकसेवक व माझेमधील संभाषण हे व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येवुन ध्वनिमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले.

दि. १५/०९/२०२० रोजी दोन शासकिय पंच व पडताळणी पथक यांचेसह लोकसेवक श्री सुभाष यांनी माझेकडे केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या पडताळणी संदर्भातील कारवाई सुरु करण्यात आली. लोकसेवक व माझेतील प्रत्यक्ष भेटीतील संभाषण ध्वनिमुद्रीत करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर शर्टाच्या आतील बाजुस लावला. माझे सोबत लाचेच्या मागणी संदर्भातील पडताळणी कारवाईच्यावेळी मी व पंच श्री देशपांडे यांचेसह मी रहात असलेल्या परिसरातील येवले चहा जवळ, धारावी, मुंबई येथे भेटलो. त्यावेळी लोकसेवक सुभाष यांनी माझे सोबत माझे घराच्या कामाबाबत चर्चा केली परंतु लोकसेवक सुभाष यांनी लाचेच्या रक्कमेबाबत स्पष्ट मागणी केली नाही.

तसेच पुन्हा लोकसेवक सुभाष यांनी मला दि.२८/०९/२०२० रोजी भेटण्यास सांगितले असता मी लाप्रवि विभागाचे पो.नि. शिंदे यांना माहिती दिली. त्यावरुन मी दि.२८/०९/२०२० रोजी लाप्रवि कार्यालयास हजर होवुन दोन शासकिय पंच व पडताळणी पथक यांचेसह लोकसेवक श्री सुभाष यांनी माझेकडे केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या पडताळणी संदर्भात कारवाई सुरु करण्यात आली. लोकसेवक व माझेतील प्रत्यक्ष भेटीतील संभाषण ध्वनिमुद्रीत करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर शर्टाच्या आतील बाजुस लावला. पडताळणी कारवाईच्यावेळी लोकसेवक सुभाष यांनी मला छोटा सायन हॉस्पीटल, ६० फिट रोड, धारावी मुंबई या ठिकाणी भेटावयास बोलाविल्याने मी, पंच देशपांडे यांचेसह सदर ठिकाणी गेलो. तेथे लोकसेवक सुभाष मला भेटले. सुभाष यांनी माझे घर बांधकाम करुन दुरुस्त करावयाचे असल्यास रु. २५,०००/– इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी करुन काम पुर्ण झाल्यानंतर सदरची रक्कम देण्यास सांगितले. लोकसेवक सुभाष व माझेतील संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरमध्ये

Scanned with CamScanner

ध्वनिमुद्रीत झाले असुन सदरचे संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यावेळी लोकसेवक सुभाष यांनी **" पच्चीस कर देना बस. "** असे बोलुन लाचेच्या मागणीबाबत खात्री झाल्याने सापळा कारवाई करण्याचे ठरविले.

त्यानंतर दि.३०/०९/२०२० रोजी लोकसेवक सुभाष हे अचानकपणे माझे रहात्या घराचे बांधकाम तपासणी करण्याकरीता आले व त्यानी माझे घराचे बांधकाम पाहीले व रु. २५,०००/– हे दि. ०१/१०/२०२० रोजी देण्यास सांगितले. याबाबत मी लाप्रवि चे पो.नि. शिंदे यांना माहिती दिली असता दि.०१/१०/२०२० रोजी लाप्रवि कार्यालयास येवुन सापळा कारवाईचे आयोजन केले. त्यावेळी मी माझेकडे बचतीमधील रु.२०,०००/– इतकी शिल्लक असलेली रक्कम पो.नि. शिंदे यांना सापळा कारवाईकरीता वापरण्यास दिले. त्यावेळी सापळापुर्व व सापळा कारवाईचे आयोजन करुन मी रहात असलेल्या परिसरात पंचासह जावुन थांबलो परंतु लोकसेवक श्री सुभाष हे डेमोलेशनच्या कामामध्ये व्यस्त असल्याने ते येवु शकणार नसल्याची माहिती माझे मित्रामार्फतीने प्राप्त केली व तसे सापळा अधिकारी यांना सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक सुभाष यांना त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी माझा कॉल स्विकारला नाही. त्यामुळे त्या दिवशीची सापळा कारवाई काढुन घेण्यात आली. मी सापळा कारवाईकरीता दिलेली रक्कम मला परत देण्यात आली.

त्यानंतर दि.०३/१०/२०२० रोजी लोकसेवक श्री सुभाष यांनी मला माझे मोबाईलवर फोन करुन ६० फिट रोडवरील येवले चहा समोर बोलविले. तेथे मी गेलो असता, त्यांनी माझा दि.१६/०९/२०२० रोजी म.न.पा. वार्ड कार्यालयामध्ये घर दुरुस्तीकरीता परवानगी मिळण्याकरीता केलेला अर्ज मला दाखविला. तेव्हा लोकसेवक सुभाष यांनी मला सांगितले की, अर्ज करण्याची काय गरज होती. मी तुला बोललो ना, की काम झाल्यावर येवुन भेट. माझा हात तुझे पाठीवर आहे. मी सांगितलेल्या पैश्याचा बंदोबस्त झाला का? तेव्हा मी त्यांना म्हणालो की, पैश्याचा बंदोबस्त चालु आहे. तेव्हा त्यांनी मला सोमवार दि.०५/१०/२०२० रोजी ते आर.टी.आय. कार्यकर्ते श्री जाहीद शेख यांच्या सचिनम को.ऑ.हौ.सो. इमारती जवळ, धारावी येथे येणार असल्याने तेथे भेटण्यास सांगितले. तेव्हा मी त्यांना किती वाजता भेटु असे विचारले असता, मी सोमवारी कळवितो असे लोकसेवक सुभाष यांनी सांगितले. याबाबतची माहिती मी ला.प्र.वि. विभागाचे पो.नि. शिंदे यांना दिली.

आज दि.०५/१०/२०२० रोजी मी पो.नि. शिंदे यांचे समक्ष हजर झालो. माझेकडील बचतीमधील रु. २०,०००/– इतकी शिल्लक असलेली रक्कम पो.नि. शिंदे यांना सापळा कारवाईकरीता वापरण्यास दिले.

सदरच्या रक्कमेस पोलीस चालक श्री मर्चन्डे यांनी लाप्रवि कार्यालयातील गोपनिय कक्षात पावडर लावली व ती रक्कम माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला, पंच व सापळा पथक यांना सापळा कारवाई दरम्यान खबरदारीच्या सुचना दिल्या. तसेच लोकसेवक श्री सुभाष यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर इशारा म्हणुन सापळा पोलीस पथकास दिसेल अशा पध्दतीने तोडावरील मास्क संपुर्णपणे काढावा अशी सुचना मला दिली. त्यानंतर मला आर.टी.आय. कार्यकर्ते श्री जाहीद शेख यांनी माझे मोबाईलवर कॉल करुन लोकसेवक सुभाष हे जाहीद शेख यांच्या घरी आले असुन लोकसेवक सुभाष यांनी मला तेथे बोलविले आहे असे सांगितले. तेव्हा पो.नि. शिंदे यांनी माझे शर्टाच्या आतील बनियानला व्हाईस रेकॉर्डर लावुन चालू केला. त्यानंतर तात्काळ मी व पंच श्री देशपांडे, असे लोकसेवकाने भेटावयास बोलविलेल्या ठिकाणी सचिनम को.ऑ.हौ. सो. इमारती जवळ, तळमजला, धारावी येथे गेलो. आमचे मागोमाग सापळा पथक देखील होते. तेव्हा पंच रोकडे व देशपांडे असे माझे पासुन जवळच काही अंतरावर उभे राहिले. त्यानंतर मी श्री जाहीद अली शेख यांच्या सचिनम बिल्डिंग, तळमजल्यावरील रुम न. ४४६ च्या घराबाहेर उभा राहुन दरवाजा ठोठावला असता, सदर रुम मधुन माझे परिचयाचे म.न.पा. कर्मचारी श्री बसवाणी बाहेर आले. व ते मला म्हणाले की, सुभाषने माझेजवळ पैसे देण्यास सांगितले आहे. तेव्हा मी सदरची रक्कम ही सुभाष यांना दयावयाची असल्याचे बसवाणी यांस सांगितले. त्यावर बसवाणी यांनी सुभाष यांस घरा बाहेरील पॅसेजमध्ये बोलविले. त्यानंतर लोकसेवक सुभाष जाहिद यांच्या घराबाहेर आले व सुभाष यांनी माझेकडे हाताने इशारा करुन रक्कम देण्यास सांगितले. तेव्हा मी माझे पॅन्टच्या उजव्या खिश्यात ठेवलेली रु. २०,०००/– रक्कम बाहेर काढुन सुभाष यांना दिली. व सदरची रक्कम लोकसेवक सुभाष यांनी स्विकारुन त्यांचे सोबत असलेले लोकसेवक श्री बसवाणी यांचे कडे दिली लोकसेवक श्री बासवाणी यांनी



Scanned with CamScanner

यांनी सदरची रक्कम पॅन्टच्या पाठीमागील उजव्या खिश्यात ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास लोकसेवकाने लाच स्विकारल्याबाबत तोंडावरील मास्क हाताने खाली करुन पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावर सापळा पथकातील अधिकारी व अंमलदारानी लोकसेवक श्री सुभाष व लोकसेवक बसवाणी यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

त्यानंतर सापळा पथकाने लोकसेवक सुभाष, लोकसेवक बसवाणी व मला तात्काळ धारावी पोलीस ठाणे येथे घेवुन गेले. तेथे पहिल्या मजल्यावरील एका रुम मध्ये अंधार करुन अल्ट्राव्हायलेट लाईटच्या उजेडात माझे हाताची पॅन्टच्या खिश्यांची तसेच लोकसेवक सुभाष यांच्या हाताची, लोकसेवक बसवाणी यांच्याहाताची व पॅन्टच्या मागील खिश्याची तसेच पॅन्टमध्ये मिळुन आलेली लाचेची रक्कम रु. २०,०००/– ची पंचासमक्ष पहाणी करण्यात आली. त्यानंतर दोन्ही लोकसेवकाना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई कार्यालयात पुढील कार्यवाहीकरीता घेवुन आले.

दि. २८/०९/२०२० रोजीच्या पडताळणी व दि.०५/०९/२०२० रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक सुभाष व लोकसेवक बसवाणी यांचेशी माझे झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आले. सदर ध्वनिमुद्रीत संभाषण पो.नि. शिंदे यांनी मला ऐकवून माझे मदतीने पोलीस अंमलदार मठपती यांच्या मार्फतीने त्याची प्रतिलिपी संगणकावर तयार केली. मी व लोकसेवक सुभाष यांचेमध्ये झालेले संभाषण ओळखुन त्याबाबत पोलीस अंमलदार मठपती यांना दिलेल्या माहितीवरुन श्री मठपती यांनी संभाषणासमक्ष तशी नोंद घेतली आहे.

यातील लोकसेवक सुभाष राउत व लोकसेवक बसवाणी नौकुडकर यांच्याशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देवाण–घेवाणीचे व्यवहार नाहीत. तरी लोकसेवक सुभाष यांनी कायदेशीर परिश्रमाखेरीज स्वतःच्या फायदयाकरीता माझे घराच्या दुरुस्तीच्या बांधकामावर कारवाई न करण्यासाठी माझेकडे रु. २५,०००/– इतक्या रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रु. २०,०००/– रक्कम स्विकारली व सदर लाचेची रक्कम लोकसेवक बसवाणी यांच्याकडे दिली असता बसवाणी यांनी स्वतःच्या खिश्यात ठेवुन लोकसेवक सुभाष यांस मदत केली म्हणुन माझी म.न.पा मुकादम लोकसेवक सुभाष शिवराम राउत व म.न.पा वाहन स्वच्छक लोकसेवक बसवाणी तुकाराम नौकुडकर, दोघेही नेमणुक जी. नॉर्थ वार्ड, म.न.पा. दादर मुंबई यांचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मला वाचुन हिन्दीतुन समजावुन सांगितला असता तो माझे सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष
06/10/2020
( अमोल शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Majid



Scanned with CamScanner